# जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा

**सन २०१६-१७ करीता बुलडाणा जिल्ह्यातील मागील वर्षातील उर्वरीत १३ व सन २०१६-१७ मधील उर्वरित १३ असे एकुण २६ रेतीस्थळास DEAC व DEIAA समितीचे मान्यतेच्या अधिन राहुन ई-निविदा नि ई-ऑक्शन प्रक्रियेद्वारे लिलावाबाबत**

**अंतिम फेर ई-निविदा नि ई-लिलाव सुचना**

सन २०१६-१७ करीता बुलडाणा जिल्ह्यातील रेतीघाटांचे शासन निर्णय क्र.गौखनि १०/०५१२/प्र.क्र. ३००/ख, दिनांक १२ मार्च २०१३ अन्वये DEAC व DEIAA समितीचे मान्यतेच्या अधिन राहुन ई-निविदा व ई-लिलाव घेण्यात येत असल्याबाबत याद्वारे जाहिर सूचना देण्यात येत आहे.

**१)** ई - निविदा व ई - लिलाव हे पर्यावरण समिती DEAC व DEIAA चे अधिन राहुन करण्यात येत असुन पर्यावरण समिती DEIAA ची अनुमती प्राप्त न होणा-या रेतीगटातून उत्खननास कोणत्याही परिस्थितीत परवानगी देण्यात येणार नाही.

**२)** लिलाव घेण्याची तारीख काहीही असली तरी लिलाव **दि.३०/९/२०१७** पर्यतच्या कालावधी करीताच राहतील.

**३)** लिलावधारकास फक्त त्याने लिलावापोटी भरलेली १/४ रक्कम परत करण्यात येईल. **त्याकरीता लिलावधारकास कोणताही दावा/व्याजाची मागणी करता येणार नाही**

**४)** लिलावाची कार्यवाही करतांना लिलावाच्या बोलीच्या अनुषंगाने भरुन देण्यात येणारी १/४ रक्कम, नेट बँकीग, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड (एनईएफटी/आरटीजीएस) पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन (संगणकीय) पध्दतीने जिल्हाधिकारी यांचे खात्यामध्ये जमा करावी लागेल.

**५)** पर्यावरण अनुमतीच्या अधिन राहुन १/४ रक्कम लिलाव अंतीम केल्यानंतर तात्काळ शासनाच्या निधीत जमा करण्यात येईल.

**६)** लिलावाच्या बोलीप्रमाणे उर्वरित ३/४ रक्कम लिलावधारकाने जमा केल्यानंतर व नियमानुसार करारनामा केल्यानंतर लिलावधारकास वाळू/ रेतीघाटाचा ताबा विहीत कालावधीत देण्यात येईल.

**७)** सर्वोच्य ई - निविदा, ई -लिलाव धारकाने सुरक्षा अनामत ठेव, पर्यावरण शुल्क, आयकर शुल्क, भूपृष्टभाटक रक्कम, सर्व्हेक्षण शुल्क, मुल्यवर्धीत कर (VAT), बँक गॅरंटी रक्कम व इतर शासकिय येणे जमा केल्यानंतर करारनामा करण्यात येईल.

**८)** शासन निर्णय क्र.गौखनि १०/०५१२/प्र.क्र.३००/ख., दिनांक १२ मार्च २०१३ मध्ये नमुद सर्व तरतूदी आणि अटी व शर्ती पालन करावे. तसेच शासनाकडून प्राप्त होणा-या सर्व शासन निर्णय, परिपत्रके, पत्रात दिलेल्या निर्देशानुसार निविदाधारक /लिलावधारक यांना कार्यवाही करणे बंधनकारक राहतील.

प्रचलित पध्दतीनुसार बुलडाणा जिल्हातील जिल्हा, तालुका एक घटक म्हणून प्राप्त सर्वोच्च ई-निविदा / ई बोली, यापैकी जी रक्कम जास्त असेल त्यां लिलावधारकांचा लिलाव मंजूर केल्या जाईल. अन्यथा **या जाहीरातीत दिलेल्या** तालुक्यातील घाटांची ई-निविदा /ई बोली अथवा त्या त्या तालुक्याची उच्चतम ई निविदा / ई बोली यातील महत्तम रकमेवर तालुका घटक धरुन प्रत्येक तालुक्याचा ई-लिलाव होईल. वरील दोन्ही प्रकारात ई-लिलाव न झाल्यास प्रत्येक रेतीघाटाचा गट क्रमाक (लॉट) मध्ये दर्शविल्याप्रमाणे ई-लिलावातील ई निविदा /ई बोली यातील महत्तम रकमेवर रेतीघाटाचा लिलाव होईल. **जाहिरात प्रसिध्दीचा खर्च यशस्वी लिलावधारकांना भरावा लागेल.**

बुलडाणा जिल्ह्यातील मागील वर्षातील **उर्वरीत १३ व सन २०१६-१७ मधील १३ अशा एकुण २६ रेतीघाटांकरीता प्रथम फेर** ई-निविदा व ई-लिलाव प्रक्रियेद्वारे रेती/वाळू निर्गती करणेसाठी निविदासह आवश्यक माहिती https://eauctioncollbul.abcprocure.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.सदर वेबसाईटची लींक जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यांच्या www.buldhana.nic.in या वेबसाईटवर देण्यात आलेली आहे. तसेच रेतीघाटा संबंधीचे लिलावाची सुचना, लिलावाच्या अटी व शर्ती, जिल्हयातील सर्व रेतीघाटांची व त्यांचे ऑफसेट प्राईसचे विस्तृत माहितीचे विवरणपत्र व करारपत्र/प्रतिज्ञापत्र याबाबत सर्व माहिती जिल्हाधिकारी कार्यालय (खनिकर्म विभाग), सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिल कार्यालयात सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

इच्छुक कंत्राटदारांना ई-निविदा व ई-लिलावात भाग घेण्यासाठी विनंती करण्यात येत आहे. ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्याकरीता डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट असणे आवश्यक आहे. https://eauctioncollbul.abcprocure.com ह्या वेबसाईटवर संगणकीय नोंदणी (ऑनलाईन रजिस्ट्रेशन)करणे आवश्यक आहे. तसेच ई-मेल आयडी, पॅन कार्ड, टिन नंबर (सर्टीफिकेट), करारपत्र/ प्रतिज्ञापत्र, Address Proof, अपलोड करुन रजिस्ट्रेशन करता येईल.

अटी व शर्तीनूसार ई-निविदा भरु इच्छिणाऱ्या व्यक्तींना निविदा १) ज्या वाळू गटाची हातची किंमत रु.१० लाख पेक्षा जास्त आहे त्याकरिता अर्ज फी रु. ५०००/- अधिक प्रोसेसिंग फी रु.१५५३/- एकुण रु. ६५५३/- (ना-परतावा) भरावे लागेल, २) ज्या वाळू गटाची हातची किंमत रुपये १० लाख पेक्षा कमी आहे. त्याकरिता अर्ज फी रु. २०००/- अधिक प्रोसेसिंग फी रु. १५५३/- असे एकुण रु. ३५५३/-( ना-परतावा) ई-पेमेंट जसे **:-** नेट बँकींग/ क्रेडीट कार्ड/ डेबिट कार्ड (एनईएफटी/ आरटीजीएस) पध्दतीने भरावे लागेल.

..२..

तसेच अटी व शर्तीनुसार ई-निविदा सोबत १) ज्या वाळूगटाची हातची किंमत रु. १० लाख पेक्षा जास्त आहे त्या घाटाकरीता लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीला रु. ३ लाख किंवा ऑफसेट प्राईसच्या २०% यापैकी जी जास्त असेल ती (EMD) म्हणुन वर नमुद पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन (संगणकीय) पध्दतीने जमा करावी लागेल. २) ज्या वाळू गटाची हातची किंमत रुपये १० लाख पेक्षा कमी आहे त्याकरीता २०% अनामत रक्कम (EMD) म्हणुन वर नमुद पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन (संगणकीय) पध्दतीने जमा करावी लागेल.ज्या कंत्राटदारांनी ई-निविदा ज्या रेतीघाटासाठी भरली असेल त्या रेतीघाटासाठी ई-ऑक्शन (ई-लिलाव) पध्दतीमध्ये भाग घेता येईल.

निविदेसोबत पॅन कार्ड, टिन नंबर (सर्टीफिकेट), करारपत्र/ प्रतिज्ञापत्र, Address Proof इत्यादी कागदपत्रांची स्कॅन कापी जोडणे आवश्यक आहे. तसेच सदरहू मूळ कागदपत्रे ऑन लाईन रजिस्ट्रेशन बंद झाल्यानंतरचे दुस-या दिवशी खनिकर्म विभागात सादर करणे बंधनकारक आहे.

ई-निविदा व ई-ऑक्शन पध्दतीने रेती/वाळू निर्गती करणेसाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे.

| दिनांक | तपशिल |
|---|---|
| २७/०१/२०१७ | **सकाळी १०.०० वाजेपासून ऑनलाईन रजिस्ट्रेशन (संगणकीय नोंदणी) सुरु होईल.** |
| ०३/०२/२०१७ | **सायंकाळी ६.०० वाजता ऑनलाईन रजिस्ट्रेशन बंद होईल.** |
| ०४/०२/२०१७ | **सकाळी १०.०० वाजेपासून ऑनलाईन रजिस्ट्रेशनला (संगणकीय नोंदणी) मान्यता देणे** |
| ०५/०२/२०१७ | **सकाळी १०.०० वाजेपासून ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने भरणे सुरु होईल.** |
| १३/०२/२०१७ | **रात्री ६.०० वाजता ऑनलाईन ई-निविदा भरणे बंद होईल.** |
| | **सन २०१६-१७ करीता जिल्हयातील मागील वर्षातील उर्वरीत १३ व सन २०१६-१७ मधील १३ अशा एकुण २६ रेतीघाटांकरीता गट (लॉट) नुसार प्रत्येक रेतीघाटांचे हातच्या किंमतीवर (ऑफसेट प्राईज) लिलावधारकास ई बोली बोलण्यास सुरुवात करावी लागेल. ई निविदा /ई लिलाव यातील महत्तम रकमेचा लिलाव मंजूर करण्यात येईल.** |
| १४/०२/२०१७ | **ई-लिलाव (ई-ऑक्शन) खालीलप्रमाणे करण्यात येईल.**<br>**गट (लॉट) क्रमांक १ :** सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत (वेळ समाप्तीचे वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणालीद्वारे प्रत्येकी १० मिनीट प्रमाणे ५ (पाच) वेळा वाढ करण्यात येईल.<br>**गट (लॉट) क्रमांक २ :** दुपारी १.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत (वेळ समाप्तीचे वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणालीद्वारे प्रत्येकी १० मिनीट प्रमाणे ५ (पाच) वेळा वाढ करण्यात येईल. |
| १४/०२/२०१७ | **उक्त ई लिलावाची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर दि.१४/०२/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजता ई-निविदा डाऊनलोड करुन जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणाचे सभागृहात येथे उघडण्यात येईल व ई निविदा /ई लिलाव यातील महत्तम रकमेचा लिलाव मंजूर करण्यात येईल.** |

ज्या वाळूगटाची हातची किंमत रु. १० लाख पेक्षा जास्त आहे त्या घाटाकरीता ई-लिलाव बोली कमीत कमी रुपये १०,०००/- ने व त्यापुढे कितीही रकमेने बोलता येईल. तसेच ज्या वाळूगटाची हातची किंमत रु. १० लाख पेक्षा कमी आहे त्या घाटाकरीता ई-लिलाव बोली कमीत कमी रुपये ५,०००/- ने व त्यापुढे कितीही रकमेने बोलता येईल.

सर्वोच्च ई-निविदा/ ई-ऑक्शन धारकास पॅन कार्ड, टिन नंबर (सर्टीफिकेट), करारपत्र/ प्रतिज्ञापत्र, Address Proof ची लिलाव प्रक्रीया संपताच जिल्हाधिकारी कार्यालय (खनिकर्म शाखा) सादर करावी लागेल.

ई-निविदा अथवा ई-ऑक्शन स्विकारणे किंवा नाकारणे तसेच तांत्रिक अडथळा निर्माण झाल्यास सदर कार्यवाही पुढे ठेवणे संबंधीचा अधिकार अपर जिल्हाधिकारी, बुलडाणा यांनी राखुन ठेवला आहे.

**टिप:** गट (लॉट) निहाय रेतीघाटाची माहिती https://eauctioncollbul.abcprocure.com या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) व www.buldhana.nic.in वर प्रसिध्द करण्यात आली आहे. **ई-निविदा किंवा ई-ऑक्शन बाबत कोणत्याही अडचणीकरीता पुढील दुरध्वनी/ भ्रमणध्वनी किवा ई-मेल वर संपर्क साधावा :** 91 7940016835, 837, 867, 802, 879, 886, 865, 883, 852, 823, 891, **Fax** +91 7940016879, **Email : info**@abcprocure.com, support@abcprocure.com, आहे.

बुलडाणा

दि. २०/०१/२०१७

**अपर जिल्हाधिकारी,**
**बुलडाणा**

# सन २०१६-२०१७ करिता दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ पर्यंत मुदतीसाठी

**वाळू/ रेती निर्गती नवीन धोरण- शासन, महसूल व वन विभाग निर्णय क्र.गौखनि १०/५१२/प्र.क्र.३००/ख, दिनांक १२.०३.२०१३ नुसार बुलडाणा जिल्ह्यातील मागील वर्षातील उर्वरीत १३ रेतीघाट व सन २०१६-१७ मधील १३ रेतीघाट असे एकुण २६ रेती घाटाचा DEIAA व DEAC समितीचे मान्यतेस अधिन राहुन अंतिम फेर ई-निविदा नि ई-लिलाव करीता**

## (अ) सर्वसाधारण निर्देश अटी आणि शर्ती

**रेती /वाळू घाटांकरीता ई-टेंडरींग (ई-निविदा) व ई-ऑक्शन (ई-लिलाव) पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.**

१) वाळू गटासाठी निश्चित करण्यात आलेल्या अपसेट प्राईस (हातची किंमती) पेक्षा अधिक बोलीने ई निविदा भरुन ई ऑक्शनद्वारे लिलावाला सुरुवात करण्यात येईल.

२) ई-निविदा/ई-लिलावाद्वारे लिलावात बोलण्यात आलेल्या बोलीच्या रकमा हातच्या किंमतीपेक्षा जास्त नसल्यास विभागीय आयुक्तांच्या निर्देशास अनुसरुन त्या वाळू गटाचा १० दिवसाच्या आत फेरलिलाव करण्यात येईल.

३) लिलावात भाग घेऊ इच्छिणा-या व ई निविदा भरु इच्छिणा-या प्रत्येक व्यक्तीला अनामत रक्कम ई निविदा भरतांना ऑनलाईन (Online) पध्दतीने भरावी लागेल. ज्या बोलीदाराची उच्चतम ई निविदा ई ऑक्शननंतर स्विकारण्यात येईल,त्याची रक्कम त्याने नियमानुसार भरावयाच्या बोलीच्या १/४ रकमेत समायोजित करण्यात येईल. ज्या बोलीदाराची निविदा स्विकारण्यात येणार नाहीत त्यांच्या अनामत रकमा लिलाव संपल्यानंतर ऑनलाईन (Online) पध्दतीनेच ई निविदा भरतांना दिलेल्या बँक खात्यामध्ये परस्पर परत (Refund) केली जाईल.

४) ई-निविदा/ई-ऑक्शनद्वारे लिलाव घ्यावयाच्या रेती/वाळू स्थळात अपेक्षित वाळूसाठा आहे किंवा नाही, वाहतुकीसाठी आवश्यक रस्ते उपलब्ध आहेत किंवा नाहीत, आणि रेतीघाटात पाणी आहे किंवा कसे याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी संबंधित लिलावधारकाची राहील. त्यानंतर याबद्दल कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही. **तसेच लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.**

५) ई-निविदा/ई लिलावातील सर्वोच्च बोलीचा देकार स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा निर्णय जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचा राहील. सदर निर्णय संबंधीतास लिलावाच्या दिवशीच कळविण्यात येईल. ई-लिलावातील ई निविदा /ई बोली यातील महत्तम रकमेवर रेतीघाटाचा ई-लिलाव होईल व जाहिरात प्रसिध्दीचा खर्च यशस्वी लिलावधारकांना भरावा लागेल.

६) **ई-लिलावातील ई निविदा /ई बोली यातील महत्तम रक्कमेचा लिलाव** स्विकारण्यात येईल त्याला त्याने दिलेल्या निविदा (EMD) ची अनामत रक्कम ३,००,०००/- किंवा अपसेट प्राईसच्या २०% रक्कम व सर्वोच्च बोलीची येणारी १/४ रक्कम (२५%) यामधील तफावतीची रक्कम **तीन दिवसांत** भरावी लागेल तसेच सर्वोच्च ई-निविदा/ई-लिलावधारकास लिलावाच्या सर्वोच्च बोलीप्रमाणे उर्वरित ३/४ रक्कम, पर्यावरण शुल्क, २% आयकर शुल्क (TCS), भूपृष्टभाटक रक्कम, सर्व्हेक्षण शुल्क, मुद्रांक शुल्क, मुल्यवर्धीत कर (VAT), बँक गॅरंटी रक्कम (२%), सुरक्षा अनामत रक्कम (२०%) या सर्व रकमा **लिलाव मंजूर केल्यापासुन (मंजूर आदेशापासून) १५ दिवसांचे आत** कोणत्याही परिस्थितीत जमा करावी लागेल. अन्यथा सदरील ई-निविदा/ ई-लिलाव रद्द करण्यात येईल.

७) ई-निविदा / ई-लिलावातील सवोच्च बोली स्विकारल्यानंतर व १/४ रक्कम भरल्यानंतर ई निविदेनुसार उर्वरीत रक्कम भरण्यास तयार असल्याबाबतच्या हमीचे दायीत्व स्विकारणाऱ्या दोन व्यक्तीसह लिलावधारक स्वखर्चाने खरेदी केलेल्या रुपये १००/- इतक्या रकमेच्या मुद्रांकीत (स्टॅम्प पेपर) कागदावर करारनामा करुन देईल, असे करारपत्र करुन न दिल्यास त्याने भरलेली १/४ रक्कम जप्त करण्यात येईल व संबंधीत रेती / वाळु गटाचा फेर लिलाव करण्यात येईल. तसेच विहित कालावधीत वरील प्रमाणे करारपत्र न केल्याच्या परिणामी लिलावधारकास होणाऱ्या कोणत्याही नुकसानाची जबाबदारी शासनावर राहणार नाही. लिलावाच्या बोलीतील रकमेपैकी वरील अ.क्र. ३ प्रमाणे भरलेली अनामत रक्कम वजा जाता शिल्लक राहीलेली ७५ % (३/४) रक्कम सर्वोच्च ई-निविदा/ई-लिलाव स्विकारल्यापासून १५ दिवसात एक रकमी भरावी लागेल. लिलावधारकाने शिल्लक राहीलेली ७५ % (३/४) रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्यानंतर जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांचेकडुन ताबा देण्याचे आदेश त्वरीत (किमान तीन दिवसांत) निर्गमित केले जातील. लिलावधारकाने रक्कम भरल्यानंतर व करारपत्र केल्याचे दिनांकापासून उशिरात उशिरा सात दिवसांचे आंत तहसिलदार यांच्याकडून लिलावधारकांनी अटी व शर्तीमधील सर्व बाबींची पुर्तता केली असल्याची खात्री केल्यानंतर लिलावधारकास वाळुस्थळाचा ताबा देण्यात येईल.

**८)** ज्यावेळी रेती/वाळू (ठेका) लिलाव रद्द करण्यात येईल अशा वेळेस त्या रेती /वाळू क्षेत्राचा नव्याने ई निविदा /ई ऑक्शन पध्दतीने फेरलिलाव करण्यात येईल. फेरलिलावात पुर्वीच्या लिलावाच्या किंमतीपेक्षा कमी किंमत आल्यास फरकाची रक्कम पुर्वीच्या लिलावधारकाकडुन **जमीन महसूलाची थकबाकी** म्हणुन वसुल करण्यात येईल. तथापी फेरलिलावात पुर्वीच्या किंमतीपेक्षा अधिक (जादा) किंमत आल्यास त्यावर पुर्वीच्या लिलावधारकाचा कोणताही हक्क राहणार नाही.

**९)** लिलावधारक, त्यांच्या लिलाव क्षेत्रातील ज्या ठिकाणातुन रेती/ वाळू काढण्याने धुप होऊ शकेल व त्यामुळे निवासी इमारतींना, घरे अथवा इतर बांधकामे यांना धोका निर्माण होईल अशा ठिकाणातुन वाळुचे स्वत: उत्खनन करणार नाही अथवा इतरांना तसे करण्यास परवानगी देणार नाही. अशा प्रकरणी उत्खनन करण्यास प्रतिबंध करणारे जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांचे निर्णय अंतीम असतील.

**१०)** विहित केलेल्या मर्यादेच्या पलिकडे असलेल्या क्षेत्रातुन रेती/वाळूचे उत्खनन करता येणार नाही. तसेच इतर व्यक्तिच्या खाजगी मालकीच्या जमीनीतुन, अशा जमीनी लिलावाने देण्यात आलेल्या क्षेत्रात समाविष्ट असल्या तरी, रेती/वाळू काढता येणार नाही तसेच रस्ते/ पायवाट म्हणुन वापरण्यात येणाऱ्या जमीनीतुन रेती/ वाळू काढता येणार नाही.

**११)** जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांना खाडी पात्रातील नौकानयन मार्गातील अडथळे दुर करणे तसेच जल-जीवन व जल संपत्तीच्या हिताच्या दृष्टीने खाडी क्षेत्रातील रेती उत्खननासाठी ड्रेझर्सचा वापर करण्यावर उचित बंधने घालता येतील.

**१२)** कोणत्याही रेल्वेच्या पुलाच्या कोणत्याही बाजुने ६०० मीटर्स (२००० फुट) अंतराच्या आत रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच जेथे नदी - नाल्यावर पुल आहेत, त्यांच्या स्तंभापासून १०० मीटर्स पर्यंत उत्खनन करता येणार नाही. कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे व पुरातत्व खात्याने प्रतिबंधीत केलेल्या क्षेत्रामध्ये रेती / वाळुचे उत्खनन करता येणार नाही.

**१३)** जेथे वाळू उत्खनन सुरु आहे, त्या ठिकाणी फलक लावून उत्खनन क्षेत्राची सिमा निश्चित करुन दर्शविण्यात यावी.

**१४)** वाळूचे/रेतीचे उत्खनन करतांना किंवा ती काढतांना खाजगी मालमत्तेस कोणतीही हानी नुकसान पोहचल्यास त्याची भरपाई करण्याचे दायित्व लिलावधारकावर राहील. अशा हानीची/नुकसानीची परिगणना सक्षम अधिकाऱ्यांकडुन करण्यात येईल व त्याबाबतचा त्यांचा निर्णय अंतीम राहील व अशी रक्कम थकीत जमीन महसुलाच्या वसूलीप्रमाणे संबंधीत लिलावधारकाकडुन वसुल करण्यात येईल.

**१५)** लिलावाने दिलेल्या ठेक्याच्या कालावधीत शासनाने तो ठेका रद्द केल्यास किंवा त्याला मंजूर केलेल्या क्षेत्राचे उत्खनन करण्यास किंवा रेती /वाळू काढण्यास बंदी घातल्यास लिलावधारकास शासनावर खटला भरता येणार नाही. लिलावधारकास कोणत्याही वैध कारणामुळे ग्रामस्थांचा विरोध, न्यायालयीन निर्णय, नैसर्गिक अडीअडचणी, प्रशासकीय यंत्रणाचा विरोध यामुळे उत्खननास किंवा वाहतुकीस बाधा आल्यास किंवा वाळूगटाचा ताबा न दिल्यास लिलावाची मुदत संपण्यापुर्वी ज्या कालावधीसाठी ठेका रद्द केला जाईल त्या कालावधीसाठी, त्याने ज्या किंमतीला ई-लिलाव घेतला त्या रक्कमेच्या प्रमाणात त्याला परवाना देण्यात येईल. अशी रक्कम परत करतांना ई-लिलाव देकाराची रक्कम अंदाजीत वाळूसाठा व प्रत्यक्ष उत्खनन केलेला वाळूसाठा विचारात घेवून त्यानुसार परताव्याच्या रकमेची परिगणना करण्यात येईल.

**१६)** उत्खनन केलेल्या किंवा काढलेल्या वाळू/रेतीची साठवणुक, लिलाव ज्या जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांनी केला असेल त्याच जिल्ह्यात **सक्षम अधिका-यांची पुर्व परवानगी घेवुन** करावी लागेल व त्यासाठी अकृषक परवान्यासह आवश्यक जमीन उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी लिलाव धारकाची असेल. वाळू/ रेती ठेक्याची मुदत संपण्यापुर्वी ज्या वाळू /रेतीचे उत्खनन केलेले आहे त्या वाळू /रेतीचा साठा मुदत संपल्यानंतर १० दिवसात उत्खननाच्या जागेवरुन हलविण्यात आला नाही तर तो शासनाच्या मालकीचा होईल व अशा वाळू/ रेतीच्या किंमतीबाबत अथवा मालकीबाबत लिलावधारकास कोणताही हक्क सांगता येणार नाही किंवा त्याबाबत शासनाविरुध्द दावा करता येणार नाही. तसेच लिलावाचा कालावधी संपल्यानंतर तसेच १० दिवसाची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाळू/ रेतीसाठा करण्यास परवानगी देता येणार नाही. किंवा त्याचा वाहतुकीसाठी दुय्यम वाहतुक पासेस देण्यात येणार नाही.

.३.

**१७)** लिलावाने दिलेल्या क्षेत्रातील वाळूच्या रेतीच्या वाहतुकीसाठी आवश्यक परवाने/ बारकोडींग पासेस पुस्तके लिलावधारकाला छपाई करुन घ्यावे लागेल. याकरिता लागणारे शुल्क लिलावधारकास भरावे लागेल. असे पासेस उपलब्ध करुन देताना लिलावाधारकास वाळूगटात उपलब्ध असलेला अंदाजीत वाळूसाठा व उत्खनन विचारात घेवून आवश्यक तेवढेच बारकोडींग पासेस पुस्तके लिलावधारकास देण्याबाबत कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालय करेल, असे वैध परवाने/ पासेस धारण करण्याऱ्यांनाच वाळू/रेतीची वाहतुक करता येईल

**१८)** शासन पत्र दिनांक ०७/०१/२०१६ अन्वये महाऑनलाईनने निर्माण केलेली मोबाईल आधारीत सुलभ **SMATS (Sand Mining Approval & Tracking System )** प्रणाली तात्पुरती बंद असल्यामुळे सन २०१५-२०१६ पासून करीता वाळु / रेती लिलावधारकांना बारकोड असलेली वाहतुक पावती पुस्तके वापरण्याबाबत निर्देश दिले होते. त्यानंतर शासन पत्र दिनांक ३/२/२०१६ अन्वये बारकोड असलेली पावती वापरणे बंद केलेले आहे. त्यामुळे जिल्हयातील वाळु/रेती निर्गतीकरीता शौर्य कंपनीकडुन रेती ठेकेदारास बारकोडयुक्त वाहतुक पासेस छपाई करुन घेवुन वाहतुक पासेसद्वारे वाळु/ रेती निर्गती करावी लागेल.

**१९)** लिलावधारकास वाळू/ रेतीची वाहतुक करण्यासाठी परवाना दयावयाचा असल्यास त्याने सरकारी संस्था/ संस्थाना प्राधान्य दिले पाहिजे.

**२०)** लिलावधारकाने सर्व प्रकारचे कर, (जिल्हा परिषद/ग्रामपंचायत/इत्यादी) विहित केल्याप्रमाणे अदा करावेत.

**२१)** प्रत्येक वाहतुक पावतीवर जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची सही व शिक्का आवश्यक राहील किंवा बारकोड पध्दतीने मिळालेल्या वाहतूक पासेस संबंधित लिलाव धारकास बंधनकारक राहील. लिलावाची पूर्ण रक्कम भरल्यानंतर वाळू साठ्याइतके उत्खनन करण्याचा कायदेशीर अधिकार लिलावधारकास/ निविदाधारकास प्राप्त होईल व त्यानुसार अंदाजित वाळू साठ्याइतकेच उत्खनन/ वाहतूक परवाने लिलावधारकास देण्यात येईल.

**२२)** लिलावधारकाने त्याला वाटप केलेल्या/मंजूर केलेल्या क्षेत्राच्या सीमा दर्शविणारे खांब उभारावे. तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीने नेमलेल्या त्याच्या उपठेकेदाराचे नाव, पत्ता व जागेचा तपशिल दर्शविणारा फलक योग्य ठिकाणी लावणे आवश्यक आहे.

**२३)** लिलाव घेण्याची तारीख काहीही असली तरी लिलाव **वर्षाच्या ३० सप्टेंबर २०१७ रोजीच संपुष्टात** येईल. लिलावाद्वारे दिलेल्या क्षेत्रातून करारात नमुद केलेल्या कालावधीत, परवानगी दिलेल्या साधनाच्या सहाय्यानेच वाळू /रेतीचे उत्खनन करण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. वाळू स्थळात अपेक्षित साठा नाही, रस्ते उपलब्ध नाहीत, वाळू स्थळात पाणी आहे, अशा तसेच मानवी वा **नैसर्गिक आपत्तीच्या कारणास्तव सदर कोणत्याही परिस्थितीत कालावधी वाढवून दिला जाणार नाही व वाळूगट बदलवून दिल्या जाणार नाही. तसेच लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.**

**२४)** उत्खनन केलेल्या वाळू/रेतीच्या वाहतुकीसाठी अस्तित्वात असलेले रस्तेच लिलावधारकाने वापरावयाचे आहेत. तसेच वाहतुकीसाठी वेगळे रस्ते उपलब्ध करुन दिले जाणार नाहीत. तसेच वाहतुकीसाठी नवीन रस्ता मिळविण्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील. रस्ते उपलब्ध नाहीत किंवा वाहतुकीसाठी बंद आहेत या कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत रेती/ वाळू उत्खननाचा कालावधी वाढवून दिला जाणार नाही अथवा रेती/ वाळूघाट बदलवून दिला जाणार नाही. लिलावात भरलेली रक्कम परत मिळणार नाही.

**२५)** नदीपात्रातून/ नाल्यातून अथवा त्याला रेती/ वाळू उत्खनन करण्यासाठी ज्या क्षेत्राचे वाटप केले असेल त्या क्षेत्रातून रेती/ वाळू उत्खनन करताना नैसर्गिक संपत्तीस व पर्यावरणास धोका होणार नाही याची सर्व खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे.

**२६)** रेती/ वाळूचे नदीपात्रातून/ नाल्यातून भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेने सर्व्हेक्षणानंतर विहित केलेल्या खोलीपेक्षा जास्त उत्खनन करण्यात येवू नये. तसेच नदीपात्र/ नाला यांचे पात्र बदलवून अथवा त्यांना हानी पोहोचवून पर्यावरणाचे नुकसान होणार नाही याचीही खबरदारी लिलावधारकाने घ्यावयाची आहे. तसेच भूजल सर्व्हेक्षण शुल्क रुपये ५०००/- चा डि.डि.उपसंचालक, भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, अमरावती यांचे नावाने जमा करावा लागेल.

**२७)** लिलावधारकाने गावकऱ्यांच्या निस्तार हक्कांस बाधा पोहोचविता कामा नये.

**२८)** रेती/वाळू उत्खनन करतांना अथवा हलवितांना अपघात झाल्यास लिलावधारकाने अपघाताची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात द्यावी.

**२९)** लिलावधारकाने रेतीच्या/ वाळूच्या वाहतुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी म्हणजे जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याने प्रमाणित व स्वाक्षरित केलेली वाहतुक पावती किंवा बारकोडद्वारे प्राप्त झालेल्या पावती वाळू/रेतीची वाहतुक करणाऱ्या प्रत्येक वाहनासोबत दरवेळी देणे आवश्यक आहे. लिलावधारकाने त्याच्या ई-लिलावात नमूद स्थळातील रेती/ वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनास त्याच्या वहन क्षमते इतक्याच परिमाणाची वाहतुक पावती द्यावी. कोणतेही वाहन त्यापेक्षा अधिक परिमाणाची रेती /वाळू नेत असल्याचे आढळून आल्यास त्या वाहनातील संपूर्ण गौण खनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीबाबत मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. दंडानीय कारवाईबरोबर जप्त केलेल्या रेतीचा फेर ई-लिलाव बोलविण्यात येईल आणि रेतीघाट धारकावरही कार्यवाही करण्यात येईल. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/ वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेतीबाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरीक्षक, महसूल अधिकारी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

**३०)** गौण खनिजाच्या उत्खननाचे, विक्रीचे व वाहतूकीच्या संबंधातील सर्व हिशोब व कागदपत्रे,लिलावाने/ परवाने दिलेल्या जागेवर ठेवली पाहिजे आणि सदहु हिशोब व कागदपत्रे संबंधित महसूल अधिकारी, खनिकर्म अधिकारी तसेच भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांच्या निरीक्षणाकरिता उपलब्ध करुन द्यावीत.

**३१)** लिलावाने दिलेल्या क्षेत्रातील वाळूच्या रेतीच्या वाहतुकीसाठी आवश्यक परवाने/ वाहतुक पावती पुस्तके लिलावधारकाला छपाई करुन घ्यावे लागेल. याकरिता लागणारे शुल्क लिलावधारकास भरावे लागेल. असे पासेस उपलब्ध करुन देताना लिलावाधारकास वाळूगटात उपलब्ध असलेला अंदाजीत वाळूसाठा व उत्खनन विचारात घेवून आवश्यक तेवढेच वाहतुक पावती पुस्तके लिलावधारकास देण्याबाबत कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालय करेल, असे वैध परवाने/ वाहतुक पासेस धारण करण्याऱ्यांनाच वाळू/रेतीची वाहतुक करता येईल.

**३२)** लिलावधारकाने करारनामा करतेवेळी लिलावाचे अटी व शर्तीचे यथोचित पालनार्थ रक्कम रु. ३,००,०००/- (रुपये तीन लक्ष फक्त) किंवा अपसेट प्राईसच्या २०% यापैकी अधिक असेल तेवढी रक्कम अनामत रक्कम म्हणून विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी यांच्याकडे ठेवणे आवश्यक आहे. परंतू ज्यावेळी वाळू घाटाची ऑफसेट किंमत रु. १० लक्षापेक्षा कमी असेल तर ऑफसेट किंमतीच्या २०% रक्कम अनामत रक्कम म्हणुन भरावी लागेल. ही रक्कम लिलावधारकाने ई लिलावाच्या मुदतीत सर्व अटी व शर्तीचे योग्यरित्या पालन केल्यास, ई-लिलावाची मुदत संपल्यावर परत करण्यात येईल. **अटी व शर्तीचे लिलावधारकाने पालन न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.**

**३३)** लिलावधारकाने नियमात नमुद केल्याप्रमाणे अटी व शर्तीचे तसेच गौण खनिज उत्खनन नियमातील तरतुदीनुसार असलेले नियम (संबंधीत विभागास लागु असलेले नियम) आणि तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदीनूसार **तसेच अन्य कायदे / नियमांचे** पालन करणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/वाळूचा पुर्ण उपयोग गौण खनिज म्हणुनच केला पाहीजे.

**३४)** रेतीचे/ वाळूचे उत्खनन करतेवेळी जर काही प्रमुख खनिज आढळून आल्यास लिलावधारकाने/ ठेकेदाराने विभागीय आयुक्त /जिल्हाधिकारी यांच्याकडे सात दिवसात कळविले पाहिजे.

**३५)** नदीपात्रात / खाडी पात्रात ड्रेझरद्वारे रेती उत्खनन करणाऱ्या ड्रेझरधारकाने पर्यावरण विभागीाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनेस अनुसरुन ड्रेझर्ससाठी परवानगी घेताना सर्व ड्रेझर्सची यादी एकत्रितपणे पर्यावरण विभागास सादर करावी. पर्यावरण विभागाने नाहरकत प्रमाणपत्राबाबत १० दिवसात निर्णय घेणे अनिवार्य आहे. तसा निर्णय न घेतल्यास संबंधीत अधिकारी /कर्मचारी यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल. लिलावधारक / परवानाधारक यांना पर्यावरण विषयक व तटीय विनियमन नियमांच्या तरतुदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

**३६)** कोल्हापुर पध्दतीचे बंधारे किंवा इतर बंधारे / बांध असलेल्या ठिकाणी पाटबंधारे विभाग/ विभागीय आयुक्त /जिल्हाधिकारी यांनी निश्चित केलेल्या अंतराच्या मर्यादेचे बंधन पाळणे आवश्यक असेल.

३७) सार्वजनिक पाणवठा/ पाणी पुरवठा व्यवस्था असलेल्या ठिकाणापासून १०० मीटर अथवा भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा निश्चित करेल तेवढया अंतरापलिकडे उत्खनन करणे आवश्यक आहे.

३८) वाळुची वाहतुक करतांना वाहनातील **वाळू प्लास्टिक पेपरने/ताडपत्रीने आच्छादीत करुनच** वाळूची वाहतुक करणे बंधनकारक आहे. अशी वाहतुक न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

३९) अंदाजित परिमाणापेक्षा अधिक वाळुसाठा रेतीगटात असल्यास त्यावर लिलावधारकास कोणताही अधिकार राहणार नाही व अंदाजित परिमाणापेक्षा अधिक उत्खनन करण्यास लिलावधारकास मुभा राहणार नाही.

४०) अवैध वाळू/ रेती साठा पकडल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील ४८ (७) व (८) नुसार कारवाई करण्यात येईल.

४१) रेतीची वाहतुक करणा-या वाहन चालकाकडे **वाहतुक पास** आहे किंवा नाही याबाबतचे निरीक्षण संबंधित महसूल यंत्रणेकडून तथा नियुक्त भरारी पथकाकडून केले असता अशा निरीक्षणाच्या वेळी वाहतुक पास आढळली नसल्यास सदरहु वाळु / रेतीची उत्खनन व वाहतुक अवैध समजून त्याविरुध्द महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ मधील कलम ४८ (७) व (८) व महाराष्ट्र नियम (विकास व विनियमन) गौण खनिज उत्खनन २०१३ आणि शासन निर्णय दिनांक १२ मार्च,२०१३ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

४२) वाळु/रेती लिलावधारकाने **वाहतुक पासवर नोंदविलेल्या परीमाणापेक्षा अधिक परीमाणाची रेती / वाळु वाहुन नेत असल्याचे आढळुन आल्यास** त्या वाहनातील संपुर्ण गौणखनिज अवैध आहे असे समजून त्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीबाबत मोटार वाहन कायदानुसार कारवाई करण्यात येईल. दंडनीय कारवाई बरोबर जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्यात येईल, त्याचप्रमाणे लिलावधारकाने रेती/ वाळूचे केलेले उत्खनन, विक्री व वाहतूक केलेल्या रेतीबाबतची दैनंदिन हिशोब नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. ही नोंदवही व इतर हिशोब कागदपत्रे जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म निरीक्षक, महसूल अधिकारी,अव्वल कारकुन,मंडळ अधिकारी,तलाठी तसेच जिल्हाधिकारी व भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयातील निरीक्षण करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी उत्खननाच्या जागेवर उपलब्ध करुन द्यावीत.

४३) शासन निर्णय क्र. गौखनि-१०/०६१६/प्र.क्र.३९०/ख, दिनांक ०२/०७/२०१६ नुसार लिलाव मंजूर करण्यात आलेल्या वाळु गटांतील पाण्याखालील वाळू/रेती उत्खननासाठी अपवादात्मक परिस्थितीत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेची अभिप्राय व DEAC व DEIAA याच्या शिफारसी प्राप्त करुन विभागीय आयुक्त यांच्या पूर्व मान्यतेने सक्शन पंपाचा वापर करता येऊ शकेल.

४४) ई निविदा ई ऑक्शनमध्ये भाग घेणा-या सर्व व्यक्ती/संस्थेस पर्यावरण विभागाचे सर्व नियम बंधनकारक राहतील.

४५) लिलावधारकाने निविदा अधिसूचना,सर्वसाधारण,विशेष निर्देश यातील अटी, शर्ती पालन केल्यानंतर लिलावधारकाशी विहीत करारनामा करुन घेतल्यानंतर तसेच लिलावधारकाने स्वखर्चाने ETS मशिनद्वारे मोजणी, Video Shooting करुन संयुक्त ताबेपावती अहवाल, CCTV लावल्याचा अहवाल सादर करणे बंधनकारक राहील.

४६) दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी यांना असतील.

४७) सदर लिलाव हे पर्यावरण अनुमतीचे अधिन राहुन करण्यात येत असुन लिलावाचा कालावधी **दिनांक ३० सप्टेंबर २०१७,** रोजीच संपुष्टात येईल.

४८) पर्यावरणाचे संतुलन राखणेसाठी निकामी वाळूचे साचलेले ढिग नदीपात्रातील वाळू उपसल्यामुळे झालेले खड्डे बुजविण्यासाठी उपयोगात आणावे. त्याची जबाबदारी लिलावधारकाची राहील.

४९) लिलावधारकास सर्व प्रकारचे कर, जसे २% आयकर **(TDS)**, विक्रीकर/मुल्यवर्धीत कर **(VAT)** सर्वोच्च बोलीच्या १०% ,पर्यावरण रेती स्थळाचे क्षेत्रासाठी प्रती एकर रुपये २७००/- प्रमाणे भुपृष्ठभाटक, मुद्रांक शुल्क व इतर कर/ शुल्काचा भरणा करणे बंधनकारक राहील.

५०) **शासन,उद्योग व उर्जा व कामगार विभाग यांचे पत्र क्र.डीएमएफ-२०१६/प्र.क्र.६९/उ-९, दिनांक २०/९/२०१६ सोबत भारत का राजपत्र,कोयला मंत्रालय,नवी दिल्ली यांची अधिसूचना दिनांक ३१/८/२०१६ अन्वये गौण खनिजाच्या संदर्भात स्वामित्वधनाच्या १०% दराने जिल्हा खनिज प्रतिष्ठान करीता १० % ना परतावा रक्कम जमा करावी लागेल.**

..६..

५१) सर्वोच्च ई-निविदा व ई-लिलावधारकास लिलाव मंजूर झाल्यानंतर नियमीत आयकर भरत असल्याचा पुरावा, पॅन क्रमांक व विक्रीकर विभागाचा टिन (TIN) क्रमांक कंपनी/ फर्म असल्यास रजिस्ट्रेशनची प्रत व १०० रुपये स्टॅम्प पेपरवर करारपत्र अनिवार्य आहे ही सर्व कागदपत्रे त्वरित खनिकर्म विभागात सादर करावी लागेल.

५२) ई-निविदा नमुना फार्म, करारपत्र, रेतीघाट यादी, अटी व शर्ती, निविदा अर्जाच्या शुल्क रुपये ६५५३/- (ई-निविदा अर्ज फी रु.५०००/- + प्रोसेसिंग फी रु.१५५३/-) व ज्या वाळूगटाची ऑफसेट प्राईस रु. १०,००,०००/- किंवा त्यापेक्षा कमी असल्यास रु.३५५३/- ( ई--निविदा अर्ज फी रु.२०००/- + प्रोसेसिंग फी रु.१५५३/-) ना परतावा ई-पेमेंट जसेः- नेट बँकींग/क्रेडीटकार्ड/ डेबिट कार्ड (एनईएफटी/ आरटीजीएस) पध्दतीने https://eauctioncollbul.abcprocure.com या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) डाऊनलोड करुन खरेदी करावा लागेल तसेच अटी व शर्तीनुसार ई-निविदा सोबत रेतीघाट अपसेट प्राईसच्या (हातची किंमत) १/४ रक्कम किंवा रु. ३,००,०००/- यापैकी जी जास्त असेल ती अनामत(EMD) रक्कम जमा करावे लागेल, परंतु ऑफसेट प्राईसची किंमत रु. १०,००,०००/- पेक्षा कमी असेल त्यावेळेस ऑफसेट प्राईसच्या १/४ अनामत रक्कम (EMD) सदर वर नमुद पध्दतीचा अवलंब करुन ऑनलाईन (संगणकीय) पध्दतीने जमा करावा लागेल. ज्या कंत्राटदाराने ई-निविदा ज्या रेतीघाटासाठी भरली असेल त्या रेतीघाटासाठी ई-ऑक्शन (ई-लिलाव) पध्दतीमध्ये भाग घेता येईल.

५३) सर्वोच्च ई-निविदा व ई-लिलावधारकास लिलाव मंजूर झाल्यानंतर नियमीत आयकर भरत असल्याचा पुरावा, पॅन क्रमांक व विक्रीकर विभागाचा टिन (TIN) क्रमांक कंपनी/ फर्म असल्यास रजिस्ट्रेशनची प्रत व १०० रुपये स्टॅम्प पेपरवर करारपत्र अनिवार्य आहे ही सर्व कागदपत्रे त्वरित खनिकर्म विभागात सादर करावी लागेल.

५४) रेती/ वाळू उत्खननाची वेळ **सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.००** वाजेपर्यंतच राहील. त्यानंतर उत्खनन आढळल्यास अवैध समजण्यात येईल.

५५) लिलावधारकाने त्यांना मंजूर केलेल्या वाळूघाटातून उत्खनन केलेल्या वाळू/ रेतीचे मासिक विवरणपत्र दर महिन्याच्या १० तारखेपावेतो संबधित तहसिलदार व जिल्हाधिकारी कार्यालय (खनिकर्म विभाग) यांना सादर करणे बंधनकारक राहील.

५६) लिलावधारकास वार्षीक पर्यावरणीय अंकेक्षण अहवाल पर्यावरण विभागास सादर करावा लागेल.

५७) पर्यावरणाची मान्यतेमध्ये पर्यावरण विभागाने लागु केलेल्या सर्व अटी व शर्ती लिलावधारकास बंधनकारक राहील.

५८) शासनास आवश्यकता भासल्यास रेतीघाट रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवलेले असुन शासन वेळोवेळी जे निर्देश,अटी व शर्ती देईल त्याचे पालन करणे बंधनकारक असेल.

५९) उक्त सर्वसाधारण निर्देश, अटी ,शर्ती मध्ये शिथिलता व फेरफार करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना राहील.

६०) दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा फेरफार करणे/ माघार घेण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना असतील

६१) जिल्हयातील ई लिलावात गेलेल्या रेतीघाटाची तपासणी संबंधित तहसिलदार यांनी दर महिन्याच्या शेवटच्या दिवशी करुन लिलावधारकाने निधारित साठयापैकी किती रेतीची उचल केली आहे. त्याबाबतचा मासिक अहवाल पुढील महिन्याच्या ५ तारखेपूर्वी खनिकर्म विभागामध्ये न चुकता सादर करावा.

६२) लिलावधारकांने प्रत्येक महिन्यात लिलावात घेतलेल्या रेतीसाठयापैकी किती रेतीचे उचल केले आहे, त्याबाबतचा मासिक अहवाल संबधित तहसिलदार यांच्याकडून प्रमाणित करुन घेऊन पुढील महिन्याच्या ५ तारखेपूर्वी खनिकर्म विभागास सादर करणे बंधनकारक राहील. विहीत कालावधीत मासिक अहवाल सादर न केल्यास उर्वरित रेतीसाठयाचे पासे निर्गमित करण्यात येणार नाही.

## (ब) विशेष निर्देश अटी आणि शर्ती

**१)** शासन पत्र दिनांक ०७/०१/२०१६ अन्वये महाऑनलाईनने निर्माण केलेली मोबाईल आधारीत सुलभ **SMATS (Sand Mining Approval & Tracking System )** प्रणाली तात्पुरती बंद असल्यामुळे सन २०१५-२०१६ पासून करीता वाळु / रेती लिलावधारकांना बारकोड असलेली वाहतुक पावती पुस्तके वापरण्याबाबत निर्देश दिले होते. त्यानंतर शासन पत्र दिनांक ३/२/२०१६ अन्वये बारकोड असलेली पावती वापरणे बंद केलेले आहे. त्यामुळे जिल्हयातील वाळु/रेती निर्गतीकरीता शौर्य कंपनीकडुन रेती ठेकेदारास बारकोडयुक्त वाहतुक पासेस छपाई करुन घेवुन वाहतुक पासेसद्वारे वाळु/ रेती निर्गती करावी लागेल.

**२)** प्रत्येक वाहतुक पावतीवर जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची सही व शिक्का आवश्यक राहील किंवा बारकोड पध्दतीने मिळालेल्या वाहतूक पासेस संबंधित लिलाव धारकास बंधनकारक राहील. लिलावाची पूर्ण रक्कम भरल्यानंतर वाळू साठ्याइतके उत्खनन करण्याचा कायदेशीर अधिकार लिलावधारकास/ निविदाधारकास प्राप्त होईल व त्यानुसार अंदाजित वाळू साठ्याइतकेच उत्खनन/ वाहतूक परवाने लिलावधारकास देण्यात येईल.

**३)** प्रत्येकवेळी ठेक्यावर २४ x ७ तास चालणारे CC TV Camera स्वखर्चाने बसविणे आवश्यक राहील. किमान ५ सि.सि.टि.व्ही. कॅमेरा लावणे आवश्यक आहे. सदर CC TV Camera अशा पध्दतीने बसवावा कि त्यात पुढील सर्व जागा Cover होतील.

i) ज्या ठिकाणी पावती फाडण्याचे व टोकन घेण्याचे काम होते ती जागा.

ii) वाळु ठेक्याचा स्पॉटवरुन आणि वाळु साठविण्याच्या स्पॉटवरुन ज्या ठिकाणाहुन गाडया बाहेर निघु शकतात व आंत जावू शकतात अशा सर्व मार्गावर (Entry & Exit Points ) , ज्याठिकाणी वाळु उत्खनन होते अशा जागी अशा प्रकारे CC TV Camera लावणे आवश्यक आहे की,त्या वाहनांचा गाडी क्रमांक, दर्शनी भागावरील टोकन क्रमांक त्यामध्ये नोंदविला जाईल.सर्व ठेके सुरु झाल्यापासून संपेपर्यत संपुर्ण ठेक्याचे बॅकअप कायम स्वरुपी जतन केले जाईल.

iii) वाळु ठेक्याचा जास्तीत जास्त जागा कव्हर होतील अशा उंच ठिकाणी CC TV Camera लावावेत की, जेणेकरुन संपुर्ण जागा Cover करता येईल.

iv) प्रत्येक ठेकेदाराने वाळु ठेक्याच्या CCTV Camera मधील फुटेज प्रत्येक आठवडयाला जिल्हाधिकारी व तहसिल कार्यालयास सि.डी. किंवा पेनड्राईव्हमध्येकिंवा External Harddisk मध्ये सादर करावी.

v) CC TV Camera चे Resolution इतके जास्त राहील की, मानसाचे चेहरे स्पष्टपणे ओळखला आले पाहीजे आणि गाडयांचे नंबर,टोकन नंबरही स्पष्टपणे दिसले पाहीजे.

vi) वाळु ठेका हा ई लिलाव आणि ई निविदा या दोन्ही पध्दतीने होणार आहे.

vii) वाळु / रेतीघाटाची तपासणी करण्याकरीता येणा-या तलाठी,मंडळ अधिकारी, तसेच महसुल अधिकारी यांना CC TV Camera चे लाईव्हस्ट्रिम आणि बॅकअप उपलब्ध करुन देणे बंधनकारक असेल.

viii) उक्त सर्वसाधारण व विशेष अटी , शर्ती मध्ये शिथिलता व फेरफार करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी /अपर जिल्हाधिकारी यांना राहील.

## (क) (करारनामा)

i) लिलावधारकाने निविदा अधिसुचना, सर्वसाधारण निर्देश, विशेष निर्देश यातील अटी, शर्ती पालन केल्यानंतर लिलावधारकाशी विहीत करारनामा करुन घेतल्यानंतर पात्र लिलावधारकास वाळु गटाचा ETS मशिनद्वारे मोजणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर ताबा देण्यात येईल.

ii) करारनामा कालावधीमध्ये सार्वजनिक हितार्थ दिलेल्या निर्देशांचे तसेच आणखी अटी , शर्ती एकतर्फी लादणेस जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी सक्षम राहतील व त्यांचे पालन करणे लिलावधारकांस बंधनकारक राहील

iii) दिलेल्या ठेक्याचे व उत्खनन परवान्याचे कोणतेही कारण न देता निलंबन करणे, रद्द करणे अथवा माघार घेण्याचे अधिकारी जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी यांना असतील.

वरीलपैकी कोणत्याही अटी, शर्तीचा भंग केल्यास सर्व अनामत रक्कम तसेच लिलावधारकाने शासनास अदा केलेली रक्कम जप्त करुन लिलाव रद्द करण्यात येईल आणि ईतरही कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**अपर जिल्हाधिकारी,**
**बुलडाणा**

बुलडाणा
दिनांक २०/०१/२०१७

रेतीघाट ई टेंडरधारकाने स्वखर्चाने विकत घेतलेल्या रुपये १००/- चे मुद्राकीत स्टॅप पेपरवर दोन साक्षीदारांचे स्वाक्षरीसह द्यावयाचा करारनामा

# करारपत्र/प्रतिज्ञापत्र

(Afreement to be sworn before Ex. Magistrate / Tahsildar)

मी नामे (पुर्ण नाव) :-

राहणार ( पोस्टाचा पुर्ण पत्ता द्यावा) :-

तालुका, जिल्हा :-

माझे/ माझ्या संस्थेचे पॅन क्रमांक :-

टिन क्रमांक :-

मी स्वतः प्रतिज्ञापुर्वक घोषित करतो की, मी रेती घाटाच्या ई - निविदेतील, ई - ऑक्शनमधील सर्व अटी व शर्तीची जाणीव करुन घेतली आहे व मी प्रस्तावित केलेल्या किंमतीत रेतीघाट घेण्यास इच्छुक असून त्यांची २५ टक्के रक्कम मी शासन जमा करीत आहे. मला सदर रेतीघाट मंजूर झाल्यास उर्वरित संपुर्ण ७५ टक्के रक्कम मी १५ दिवसांचे आत चलानद्वारे भरणा करुन मंजूर रेतीघाटाचे निष्पादन करुन घेण्याची हमी देत आहे. तसे न केल्यास मी जमा केलेली २५ टक्के रक्कम शासन जमा करण्यात यावी व नियमानुसार दुसऱ्या निविदाधारकास रेतीघाट मंजूर केल्यास अथवा फेरनिविदाद्वारे विल्हेवाट केल्यास तसेच शासनास झालेले नुकसान जमीन महसूलाची थकबाकी म्हणुन वसुल केल्यास माझी काहीच हरकत राहणार नाही याची मला जाणीव आहे.

१. मी असेही घोषित करतो की, सदर्हु रेतीघाट आणि अनुमोदित पोच रस्त्याची मी पाहणी केली आहे. तसेच शासनाने दिलेल्या सर्व शर्ती व अटी मला मान्य असुन त्याबाबत अथवा रेती वाहतुकीसाठी योग्यतेबाबत मी इतर कोणताही आक्षेप उपस्थित करुन वाद निर्माण करणार नाही.
२. वाळू/रेतीघाटाचा पूर्ण रक्कमेचा भरणा केल्यानंतर मला वाळू/रेतीघाटाचा ठेका मिळल्यास सदर रेतीघाटातून रेती वाहतूकीसाठी स्वखर्चाने कंपनीकडुन बारकोडयुक्त वाहतुक पासेस छपाई करुन घेऊन ते जिल्हा खनिकर्म अधिकारी यांच्याकडून प्रमाणित करुन रेतीची वाहतुक पासेसद्वारे वाळु/ रेतीची वाहतूक करील. वापरलेले वाहतूक पासेसचे पुस्तके तात्काळ खनिकर्म विभागात जमा करील.
३. रेती ठेक्यावर २४ x ७ तास चालणारे CC TV Camera स्वखर्चाने बसविल. किमान ५ सि.सि.टि.व्ही. कॅमेरा लावण्यात. सदर CC TV Camera अशा पध्दतीने बसवील कि त्यात पुढील सर्व जागा Cover होतील.
४. ज्यास रेती विक्री करण्यात येईल त्या व्यक्तीस वाहतुक परवाना/ पावती देण्यात येईल.
५. मी असेही घोषित करतो की, माझे नाव रेतीघाट प्रक्रियेबाबत किंवा रेती ठेका चालविण्याबाबत काळ्या यादीत नाही, तसे निदर्शनास आल्यास मी फौजदारी कार्यवाही पात्र राहीन.
६. तद्वतच रेती उत्खनन/वाहतुक केल्याबाबतचे मासिक अहवाल नियमितपणे व विहित वेळेत तहसिल कार्यालय व जिल्हाधिकारी (खनिकर्म शाखा) येथे सादर करण्यास बंधनकारक राहीन.

ठिकाण

दिनांक ( )

रेतीघाट घेणाऱ्याचे नाव व स्वाक्षरी

**<u>दायित्व स्वाकारणारे दोन व्यक्ती</u>**

१. पुर्ण नाव/पत्ता व स्वाक्षरी :-

२. पुर्ण नाव/पत्ता व स्वाक्षरी :-

# बुलडाणा जिल्हा :- वाळू / रेती ई लिलाव सन २०१६-१७

## तिन वेळेस ई लिलाव घेवुनही लिलावात न गेलेल्या एकुण २६ रेतीघाटांच्या किमतीत २५ % किंमत कमी करुन अपसेट प्राईसचे विवरणपत्र

| अ. क्र. | तालुका | रेतीघाटाचे नांव | नदीचे नांव | स्थळ निर्देशक गट नं. | रेतीघाटाचे क्षेत्र (चौ.मी.) | | | रेतीघाटाचे क्षेत्र (हे.आर) | सन २०१६-१७ साठी अंदाजे रेती साठा (ब्रास) | रेतीसाठयाप्रमाणे येणारी किंमत (रुपये) | १५ % वाढ करुन येणारी प्रती ब्रास किंमत (रुपये) | सन २०१६-१७ करीता हातच्या किंमतीत २५% रक्कम कमी करुन आलेली रेतीघाट निहाय अपसेट प्राईसची रक्कम (रुपये) | लिलावात भाग घेणा-या व्यक्तीने रोखीने भरावयाची अनामत रक्कम (सरकारी किंमतीच्या २० %) (रुपये) | निविदा अर्ज व प्रोसेसिंग शुल्काची भरणा करावयाची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | लांबी | रुंदी | खोली | | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| **गट लॉट क्रमांक -०१** | | | | | | | | | | | | | | |
| १ | देऊळगाव राजा | निमगांव गुरु/ दे. मही | खडकपुर्णा | दे.मही ११३ ते ११५, १३७,१३८, निमगांव गुरु ३०७ ते ३१४ | ५६० | ७० | ०.६० | ३.९२ | ८३११ | २४९३३०० | १४८८ | **९२७५०७६** | १८५५०१५ | ६५५३ |
| २ | सिंदखेडराजा | पिंपळगांव कुडा | खडकपुर्णा | **पिंपळगांव कुडा १,७४, १६७ ते १७१,१६४,१६३** ताढशिवणी ८१ ते ८६, ९० | ५०० | ८० | ०.६० | ४.०० | ८४८१ | २५४४३०० | १०८९ | **६९२६८५७** | १३८५३७२ | ६५५३ |
| ३ | सिंदखेडराजा | राहेरी बु.- तढेगांव | खडकपुर्णा | ६१५, ६१७, ६१८, ६२६, ६२७,६२८ | ५०० | ८० | ०.६० | ४.०० | ८४८१ | २५४४३०० | १०८९ | **६९२६८५७** | १३८५३७२ | ६५५३ |
| ४ | सिंदखेडराजा | लिंगा ब | खडकपुर्णा | लिंगा-१३२, १३९ ते १४४, ताडशिवणी १३५ ते १३७,१४६,१४७,१४८, | ५०० | ६० | ०.६० | ३.०० | ६३६० | १९०८००० | १०८९ | **५१९४५३०** | १०३८९०६ | ६५५३ |
| ५ | सिंदखेडराजा | साठेगांव | खडकपुर्णा | ११८ ते १२७ | ३०० | ४० | ०.६० | १.२० | २५४४ | ७६३२०० | १६२७ | **३१०४३१६** | ६२०८६३ | ६५५३ |
| ६ | मलकापुर | वरखेड | विश्वगंगा | ५००,५०१,५०४, | ६३० | २० | ०.३० | १.२६ | १३३६ | ४००८०० | ४०० | **४००८००** | ८०१६० | ३५५३ |
| ७ | नांदुरा | रोटी | पुर्णा | १२९,१३७,१ | ६०० | ३५ | ०.६० | २.१० | ४४५२ | १३३५६०० | १७४५ | **५८२६५५५** | ११६५३११ | ६५५३ |
| ८ | नांदुरा | हिंगणाभोटा | पुर्णा | १,२,८ ते ११, | ६०० | ३५ | ०.६० | २.१० | ४४५२ | १३३५६०० | १७४५ | **५८२६५५५** | ११६५३११ | ६५५३ |
| ९ | नांदुरा | येरळी -अ | पुर्णा | ३२६ ते ३२७ | ३०० | ३० | ०.६० | ०.९० | १९०८ | ५७२४०० | १७४५ | **२४९७०९५** | ४९९४१९ | ६५५३ |
| १० | नांदुरा | भोटा | पुर्णा | १८४ ते १९० | ३७५ | ३५ | ०.६० | १.३१ | २७८३ | ८३४९०० | १७४५ | **३६४२२५१** | ७२८४५० | ६५५३ |
| ११ | नांदुरा | पातोंडा | पुर्णा | २८२ ते २८५ व १ | ३०५ | ३० | ०.६० | ०.९२ | १९४० | ५८२००० | १७४५ | **२५३८९७५** | ५०७७९५ | ६५५३ |
| १२ | नांदुरा | वडगांव | ज्ञानगंगा | १,२,१४,७३ ते ८०, | ५०० | १५ | ०.३० | ०.७५ | ७९५ | २३८५०० | १७४५ | **१०४०४५६** | २०८०९१ | ६५५३ |
| १३ | नांदुरा | पळसोडा | पूर्णा | १० ते १४ | ३३० | ४२ | ०.६० | १.३९ | २९३९ | ८८१७०० | १७४५ | **३८४६४१६** | ७६९२८३ | ६५५३ |
| १४ | नांदुरा | येरळी ब | पूर्णा | २६, २५ | २०० | १५ | ०.६० | ०.३० | ६३६ | १९०८०० | १७४५ | **८३२३६५** | १६६४७३ | ३५५३ |
| १५ | नांदुरा | येरळी क | पुर्णा | ३०८, ३११ | २०० | १५ | ०.६० | ०.३० | ६३६ | १९०८०० | १७४५ | **८३२३६५** | १६६४७३ | ३५५३ |

| अ. क्र. | तालुका | रेतीघाटाचे नांव | नदीचे नांव | स्थळ निर्देशक गट नं. | रेतीघाटाचे क्षेत्र (चौ.मी.) | | | रेतीघाटाचे क्षेत्र (हे.आर) | सन २०१६-१७ साठी अंदाजे रेती साठा (ब्रास) | रेतीसाठयाप्रमाणे येणारी किंमत (रुपये) | १५ % वाढ करुन येणारी प्रती ब्रास किंमत (रुपये) | **सन २०१६.१७ करीता हातच्या किंमतीत २५% रक्कम कमी करुन आलेली रेतीघाट निहाय अपसेट प्राईसची रक्कम (रुपये)** | **लिलावात भाग घेणा-या व्यक्तीने रोखीने भरावयाची अनामत रक्कम (सरकारी किंमतीच्या २० %) (रुपये)** | **निविदा अर्ज व प्रोसेसिंग शुल्काची भरणा करावयाची रक्कम (रुपये)** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | लांबी | रुंदी | खोली | | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| **गट लॉट क्रमांक -०२** | | | | | | | | | | | | | | |
| १६ | शेगाव | डोंगरखेड-ब | पुर्णा | ७६,७७,७८,७९,८०,८१ | २५० | १५ | ०.६० | ०.३८ | ७९५ | २३८५०० | १८३४ | **१०९३५२३** | २१८७०४ | ६५५३ |
| १७ | शेगाव | डोंगरखेड-क | पुर्णा | ५९,६०, | २०० | १५ | १.०० | ०.३० | १०६० | ३१८००० | १८३४ | **१४५८०३०** | २९१६०६ | ६५५३ |
| १८ | शेगांव | डोगरखेड अ | पूर्णा | २ ते ७, ९५, ९६ | १०० | १५ | ०.६० | ०.१५ | ३१८ | ९५४०० | १८३४ | **४३७४०९** | ८७४८२ | ३५५३ |
| १९ | शेगांव | खातखेड | पुर्णा | ३ ते ६ | २०० | १५ | ०.६० | ०.३० | ६३६ | १९०८०० | १६२८ | **७७६५५६** | १५५३११ | ३५५३ |
| २० | शेगांव | बोंडगांव | पुर्णा | १८१ ते १८४ | १८० | २० | ०.६० | ०.३६ | ७६३ | २२८९०० | १६०३ | **९१७३१७** | १८३४६३ | ३५५३ |
| २१ | शेगांव | कठोरा | पूर्णा | ७, ८, ११, १३, १४, १५ | २०० | २० | ०.६० | ०.४० | ८४८ | २५४४०० | १६०३ | **१०१९५०८** | २०३९०२ | ६५५३ |
| २२ | शेगांव | हिंगणा वैजीनाथ | मन | ९४ ते १००, १०९ ते ११७ | २०० | १५ | ०.३० | ०.३० | ३१८ | ९५४०० | १९६७ | **४६९१३०** | ९३८२६ | ३५५३ |
| २३ | खामगांव | खोलखेड | खिरोडानाला | ३४,६९,७०, | १५० | ५ | ०.३० | ०.०८ | ८० | २४००० | १६४७ | **९८८२०** | १९७६४ | ३५५३ |
| २४ | खामगांव | दोंदवाडा-अ | ज्ञानगंगा | ३,२,१,७१ ते ७५,६२, | ५०० | ५ | ०.३० | ०.२५ | २६५ | ७९५०० | १६४७ | **३२७३४१** | ६५४६८ | ३५५३ |
| २५ | खामगांव | अंबिकापूर | मस | ६१,६२,६४,६५,६६, | ५०० | ५ | ०.३० | ०.२५ | २६५ | ७९५०० | १६४७ | **३२७३४१** | ६५४६८ | ३५५३ |
| २६ | खामगांव | कारेगांव बु. | मस | १९३,१९४,१९०,१८५,१८६, ३२,३३,३४, | ३५५ | ५ | ०.३० | ०.१८ | १८८ | ५६४०० | १६४७ | **२३२२२७** | ४६४४६ | ३५५३ |
| | **एकुण** | | | | | | | | | **१८४७७०००** | | **६५८६८६७१** | **१३१७३७३४** | |

स्वाक्षरी/-

**जिल्हा खनिकर्म अधिकारी,बुलडाणा**

स्वाक्षरी/-

**अपर जिल्हाधिकारी,बुलडाणा**